# सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,सिंधुदुर्ग

प्रधान कार्यालय, सिंधुदुर्गनगरी

या बँकेच्या मालकीचे वाहन क्र. एम. एच ०७-क्यु-७६९० इनोव्हा **(Innova 2.5 VX 7S JD/JM (Colour Silver Mica Metalic)** ची ''जसे आहे तसे'' या तत्वावर फेर जाहीर लिलावाने दि.१७/१०/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता बँकेचे प्रधान कार्यालय, सिंधुदुर्गनगरी, ओरोस येथे विक्री करण्यांत येत आहे.

| अ क्र | वाहन क्रमांक | कंपनीचे नांव | मॉडेल | इंजीन नंबर | चेसीस नंबर | विंम्याची मुदत | *येणे विमा तपशिल* | | टॅक्सची मुदत | कंडीशन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | कालावधी | १७/१०/२४ रोजी येणे विमा रक्कम | | |
| १ | एम. एच ०७-क्यु-७६९० ऑक्टोंबर-२०१३ | Innova | Innova 2.5 VX 7S JD/JM (Colour Silver Mica Metalic) | 2KDU40 2412 | MBJ11JV400 74311300913 | २९/१०/२४ | ३०/१०/२३ ते २९/१०/२४ | ४४२/- | OTT | चालु स्थितीत |

**<u>लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहणार आहेत.</u>**

१. बॅक वाहन फेर लिलाव प्रकीयेत भाग घेणा-या व्यक्तीने **<u>बॅंकेकडुन पुरविल्या जाणा-या विंहीत नमुन्यातील</u>** फॉर्ममध्ये (पॅन/मतदान/आधार कार्डच्या प्रमाणीत केलेल्या झेरॉक्स प्रतीसह) संपुर्ण माहिति भरून देणे आवश्यक.

२. ज्या व्यक्तीस फेर लिलावामध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांनी प्रथम <u>रु. ५००/- (नापरतावा स्वरूपात)</u> रोख रक्कम लिलावाचे तारखे दिवशी **<u>एक तास</u>** अगोदर बँकेकडे जमा केली पाहिजे.

३. प्रत्येक बोलीच्या वेळी कमीत कमी **<u>रू.५,०००/-</u>** व त्याच्या पट्टीत बोलीची रक्कम वाढविली पाहीजे.

४. **<u>कोणतीही बोली स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार बँकेस राहील</u>.**

५. वाहनाचा विमा येणे तपशिल खालीलप्रमाणे ......

| *अनु. क्र.* | *वाहन क्रमांक* | *येणे विमा तपशिल* | |
|---|---|---|---|
| | | कालावधी | १७/१०/२४ रोजी येणे विमा रक्कम |
| १) | एम. एच ०७-क्यु-७६९० | ३०/१०/२३ ते २९/१०/२४ | ४४२/- |

६. ज्यांच्या नावावर फेर लिलाव मंजूर होईल त्यांनी लिलावाचे दिवशी **<u>त्यांचे राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये खाते असलेल्या धनादेशाव्दारेच १/४ (२५% रक्कम) रक्कम Sindhudurg Distric Central Co.Op Bank Ltd., H. O .Sindhudurgnagari या नावे स्विकारली जाईल</u>**. तसेच उर्वरित **<u>३/४ (७५% रक्कम)</u>** रक्कम पुढील कार्यालयीन दोन दिवसात बँकेकडे आपले राष्ट्रीयकृत बॅकेच्या धनादेशाव्दारेच

जमा केलेनंतर धनादेशाप्रमाणे रक्कम या **बॅंकेच्या खाती जमा झालेबाबत** खात्री झालेनंतरच बॅंक वाहनाचा ताबा देणेत येईल.

७. डिपॉझीटची रक्कम भरणा–या **एकाच व्यक्तीस फेर** लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घेता येईल .तसेच ज्या व्यक्तीच्या नावाने लिलाव **मंजूर होईल त्याच व्यक्तीस बॅंक वाहन RTO च्या कागदपत्रांवर संबंधित व्यक्तीचे संपुर्ण नाव, पत्त्यासह भरून हस्तांतरीत केले जाईल.**

८. **ज्या व्यक्तीच्या नावे फेर लिलाव मंजूर होईल त्या व्यक्तीकडुन मंजुर लिलावाप्रमाणे संपुर्ण रक्कम त्यांचे वैयक्तीक खात्यामधुनच बॅंक खाती भरणा करून घेतलेनंतरच सदर वाहन मुळ कागदपत्रांसह संबंधित व्यक्तींच्या ताब्यात देणेत येईल. तसेच सदर वाहन संबंधित व्यक्तीच्या नावे RTO कार्यालयाकडे नोंद होणेसाठी फॉर्म क्र.२८,२९ च्या मुळ प्रती संपुर्ण नाव, पत्ता, सहीसह भरणेत येवुन परस्पर रजिस्टर अे.डी.द्वारे RTO, Sindhudurg कार्यालयाकडे पाठविणेत येतील व मुळ फॉर्मच्या झेरॉक्स प्रती वाहन खरेदीदराच्या ताब्यात देणेत येतील.**

९. **आयोजित फेर लिलाव प्रक्रियेमधील बोली सुरू असताना एका व्यक्तीने अथवा समूहाने दुस–या व्यक्तींवर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्याचे बॅंकेच्या निदर्शनास आल्यास त्या व्यक्तीस/समुह व्यक्तींना लिलाव प्रक्रियेतून अपात्र ठरविणेत येईल.**

१०. **वाहन विक्रीच्या तारखेपासुन १५ दिवसांच्या आत सदर वाहन RTO कार्यालयाकडुन वाहन खरेदी दाराने आपले नावे नोंद करून घेवुन त्यासंबंधीची आर.सी बुकची झेरॉक्स प्रत या बॅंकेच्या प्र.का.मालमत्ता विभागाकडे आणुन देणे बंधनकारक राहील.**

११. **फेर लिलाव मंजूर होवुन** वाहनाच्या सर्व कागदपत्रांसह वाहन ताब्यात दिलेंपासुन वाहन संबंधीतांचे नावे होईपर्यंत सदर वाहनापासुन अपघात अथवा नुकसान घडल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी वाहन खरेदीदाराची राहील.

१२. **बॅंकेचे पदाधिकारी, अधिकारी किंवा कर्मचारी** यांना लिलावामध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भाग घेता येणार नाही.

१३. कोणतेही कारण न देता फेर लिलाव मंजूर अगर नामंजूर करणेचा **अधिकार बॅंकेस राहील.**

१४. वरील अटीमध्ये कोणतेही बदल अगर सुधारणा करण्याचा अधिकार बॅंकेने राखून ठेवलेला आहे.

१५. **फेर लिलाव बोलीचे वेळी लिलावात भाग घेतलेल्या व्यक्तींमार्फत अनुचित प्रकार घडुन कार्यालयाचे नुकसान झाल्यास अथवा कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य घडल्यास/ लिलावात भाग घेतलेल्या व्यक्तींवर कुठल्याही प्रकारचा दबाव आणल्यास संबंधित व्यक्तीस जबाबदार धरले जावून त्याचे विरूध्द कायदेशीर कारवाई केली जाईल.**

मुख्य कार्यकारी अधिकारी